पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- २८/०७/२०२०

## नक्षलविरोधात आक्रोश व्यक्त करत नागरिकांनी केली नक्षल बॅनरची होळी

- **नक्षल सप्ताहास जिल्हाभरात नागरिकांचा प्रखर विरोध**
- **मा. पोलीस अधीक्षक सा़ो. यांच्याकडुन नागरिकांचे कौतुक**

उपविभाग धानोरा अंतर्गत येणाऱ्या पोलीस मदत केंद्र सावरगाव हद्दीतील मौजा सावरगाव ते मुरुमगाव रोडवरील त्रिशुल पॉईंट तसेच मौजा सावरगाव ते मौजा गॅरापत्ती मार्गावरील मौजा कनगडीजवळ रात्री नक्षलवादयांनी नागरिकांना नक्षलसप्ताह पाळण्याविषयी आवाहन करणारे बॅनर लावले होते.

मौजा सावरगाव पंचक्रोशितील नागरिकांनी एकत्र येत सदर बॅनर काढुन त्यांची होळी केली. यावेळी उपस्थित नागरिकांनी 'नक्षलवादी मुर्दाबाद', 'नक्षल भगाव आदिवासी बचाव' च्या घोषणा दिल्या तसेच नक्षलवाद्यांचा जाहीर निषेध करण्यासाठी आम्ही गावकऱ्यांनी एकत्र येवुन नक्षल सप्ताहाला प्रखर  विरोध दर्शवत नक्षलवाद्यांनी लावलेल्या बॅनरची होळी करत असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट करुन नक्षलवादी हे सामान्य जनतेमध्ये दहशत पसरवुन विकासात अडथळा निर्माण करण्यासाठी बॅनर, पत्रके लावत असुन, सामान्य जनतेच्या विकासातील अडथळा दुर करण्यासाठी प्रत्येक गावातील नागरिकांनी नक्षलवादयांच्या बंदचा तिव्र निषेध करावा ढोंगी नक्षलवादी स्वत:चा फायदा साधण्यासाठी आदिवासींचा खुन करतात आणि दहशत पसरवुन स्वत:च्या तुंबड्या भरवुन घेतात. नक्षलवाद्यांचा धिक्कार असो. नक्षलवाद्यांनी मागील २५ वर्षापासुन नक्षल शहीद सप्ताह पाळुन कोणता विकास केला ? असा सवालही उपस्थित ग्रामस्थांनी

केला. सामान्य गरीब जनतेला नक्षल्यांच्या बंद व हिंसक कृत्याची गरज नसुन विकासाची आवश्यकता आहे. त्याकरीता लोकशाही मार्गानेच विकास साधणे आवश्यक आहे अशी प्रतिक्रीया सावरगाव पंचक्रोशितील नागरिकांनी व्यक्त केली.

एकीकडे कोरोना महामारीच्या काळात प्रशासन नागरिकांची काळजी घेत असतांना नक्षलवादी मात्र दहशत पसरविण्यासाठी व नागरिकांना मिळणाऱ्या सोयीसुविधामध्ये आडकाठी निर्माण करण्यासाठी नक्षल शहीद सप्ताहाच्या नावाखाली आदिवासींवर अन्याय करीत आहेत. निष्पाप आदिवासी नागरिकांचा खुन करणारे नक्षलवादी त्यांच्या या नराधमपणाबद्दल एक चकार शब्दही काढत नसल्याची भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली. निष्पाप आदिवासींच्या केलेल्या हत्येबाबत नक्षलवादी कधी सप्ताह पाळणार ? असा खडा सवाल त्यांनी नक्षलवादयांना केला. यावेळी सावरगाव पंचक्रोशितील नागरिकांनी बऱ्याच वर्षापासुन ग्यारापत्ती ते कटेझरी आणि कटेझरी ते मुरुमगाव रोड पुर्णत्वास नेल्याबद्दल गडचिरोली पोलीस दल व जिल्हा प्रशासनाचे आभार मानत आम्ही नक्षलवादयांना विरोध करुन विकासासाठी झटणाऱ्या प्रशासनासोबत असल्याची ग्वाही दिली.

पोलीस अधीक्षकांच्या नेतृत्वात गडचिरोली जिल्हाभरात नक्षल शहीद सप्ताहाच्या पार्श्वभुमीवर जिल्हाभरातील पोस्टे, उपपोस्टे व पोमके येथे कार्यरत प्रभारी अधिकारी यांनी दुर्गम व अतिदुर्गम भागातील गावात जावुन भेटी देवुन स्थानिक ग्रामस्थांसोबत संवाद साधला आहे. यामुळे या भागातील नागरिकांनी गडचिरोली पोलीस दलावर विश्वास दाखवत लोकशाही व संविधानाचा विरोध करणाऱ्या नक्षलवादयांना कदापि थारा न देण्याचे निश्चित केले आहे. याचाच परिपाक म्हणुन जिल्हाभरातील नागरिक नक्षल शहीद सप्ताहाला नागरिक विरोध करत आहेत. मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़े. यांनी सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले असुन नक्षलवादयांचा धिक्कार करत नक्षल शहीद सप्ताहास विरोध करणाऱ्या नागरिकांचे कौतुक केले आहे तसेच यापुढे देखील पोलीस दल सर्व जिल्हावासियांच्या पाठीशी राहील असे आश्वासन दिले आहे.





